## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्गिका

# मेट्रो-३च्या भुयारीकरणाचा ३५वा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण
# पॅकेज-४चे १००% भुयारीकरण पूर्ण

मुंबई, डिसेंबर १६, २०२० - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) सिद्धिविनायक ते दादर हा १.१२ किमी इतका लांब ३५वा भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. या भुयारीकरणासह पॅकेज-४चे एकूण १०.९६ किमी लांबीचे भुयारीकरण आज पूर्ण झाले आहे. या साठी ३ टीबीएम मशिन्स कार्यरत होती.

“एकूण ७ पैकी ४ पॅकेजेसमध्ये भुयारीकरण १००% पूर्ण झाले असून ही अत्यंत आनंदाची  बाब आहे. विशेषत: पॅकेज-४ मध्ये भुयारीकरण करणे एक आव्हानात्मक काम होते कारण या पॅकेज मधील सर्व विकासकामे रस्त्यावरील वाहतूक, धार्मिक स्थळांच्या जवळपास आहेत. शहराचे मुख्य केंद्र मानले जाणारे दादर,  मेट्रो-३ द्वारे जोडले जाईल व मुंबईकरांच्या प्रवाश्यांच्या अडचणी कमी होतील”,असे मुं.मे.रे.कॉ चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल म्हणाले.

“हेरेन्कटनेट कंपनीद्वारे बनलेले व अर्थ प्रेशर बॅलेन्स (ई.पी.बी) तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) कृष्णा-१ द्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. जुलै ७, २०२० रोजी या टप्प्याचे काम सुरू करण्यात आले होते आणि ८०५ रिंग्सचा वापर करून डाऊनलाइनचे काम पूर्ण करण्यात आले. दादर मेट्रो स्थानाकाचे जवळपास ४२% काम पूर्ण झाले आहे”, श्री एस. के. गुप्ता, संचालक (प्रकल्प), मुं.मे.रे.कॉ यांनी सांगितले.

पॅकेज-४ मध्ये दादर, सिद्धिविनायक, शीतलादेवी या स्थानकांचा समावेश असून येथे ८ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. त्यांचे तपशील पुढील प्रमाणे आहे-
*नयानगर ते धारावी (अपलाईन - ५८९ मी आणि डाउनलाईन - ५८९ मी),
*नयानगर ते दादर (अपलाईन - २४९१ मी आणि डाउनलाईन - २४७२ मी),
*सिद्धिविनायक ते दादर (अपलाईन - ११०६ मी आणि डाउनलाईन - ११२६ मी),
*सिद्धिविनायक ते वरळी (अपलाईन - १३०५ मी आणि डाउनलाईन - १२८४ मी).(समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com

MMRC